बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १८० वा | गुरूवार दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली पुरबधित करंजा गावाच्या वस्तीची पाहणी

### पालकमंत्री श्री.सरनाईक व आरोग्य मंत्री श्री.आबिटकर यांची उपस्थिती

*** ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधून जाणून घेतली नुकसानीची माहिती * करळे वस्तीला बोटीने जाऊन दिली भेट * मदतीबाबत बाधितांना केले आश्वस्त**






धाराशिव (जिमाका)- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज २४ सप्टेंबर रोजी परंडा तालुक्यातील पुरबधित करंजा गावाच्या शिंदेवस्ती आणि करळेवस्तीला भेट देऊन अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराने झालेल्या नुकसानीची पाहणी केली व उपस्थित वस्तीतील नागरिकांशी संवाद साधून झालेल्या शेतीच्या नुकसानीची व मालमत्तेच्या नुकसानीची माहिती घेतली.यावेळी उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्यासोबत पालकमंत्री श्री.प्रताप सरनाईक व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर उपस्थित होते.आमदार प्रा.डॉ. तानाजी सावंत,जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक रितू खोखर, सहायक जिल्हाधिकारी तथा भूम उपविभागीय अधिकारी रैवैयाह डोंगरे व तहसीलदार नीलेश काकडे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

मान्यवरांनी यावेळी करंजा गावाजवळील शिंदे वस्तीतील चांगदेव शिंदे यांच्या पुरबधित घराची पाहणी केली.या वस्तीचे पुनर्वसन करण्याची मागणी श्री.शिंदे यांचेकडे बाधित वस्तीतील लोकांनी केली असता नक्कीच आपले पुनर्वसन करण्यात येईल याची ग्वाही श्री.शिंदे यांनी यावेळी दिली.

श्री.शिंदे यावेळी म्हणाले की,बाधित ग्रामस्थ व शेतकऱ्यांना तात्पुरती लवकरच मदत करण्यात येईल.तसेच पंचनामे करून मदत देण्यात येईल. अटी व निकष यामध्ये शिथिलता आणण्यात येईल.यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण करू नये. मदतीपासून कोणीही वंचीत राहणार नाही.जमीन पूर्णता खरडून गेली आहे,याबाबत मदतीचे निकष बदलविण्यात येतील.असे त्यांनी सांगितले.

श्री.शिंदे पुढे म्हणाले की,बाधितांना आता मदतीची आवश्यकता असून प्रत्येकाने आपआपल्या परीने मदत करावी.नैसर्गिक आपत्ती कोसळली असून अशाप्रकारच्या संकटांना न घाबरता धीर धरावा.सरकार म्हणून आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहोत.केंद्र आणि राज्य सरकारची मदत देऊन जनतेला आधार देण्यात येईल.पंचनाम्यानंतर नुकसानीची तीव्रता समोर आल्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. असे श्री.शिंदे यांनी बधितांना आश्वस्त केले.

करंजा गावाचा भाग असलेल्या शिंदे वस्तीतील पोलीस पाटील बाळासाहेब चांगदेव शिंदे यांच्या घराचे पूर्णता नुकसान झाले असून श्री.शिंदे यांच्यासह पालकमंत्री श्री.सरनाईक, आरोग्यमंत्री श्री.आबिटकर व आमदार प्रा.डॉ.तानाजी सावंत यांनी त्यांच्या घरात जाऊन संसारोपयोगी साहित्याच्या नुकसानीची पाहणी केली.

तसेच जवळच्या करळेवस्तीला एनडिआरएफच्या बोटीने जाऊन भेट दिली व बाधित वस्तीतील लोकांशी संवाद साधून नुकसानीची माहिती जाणून घेतली. त्यांना धीर देऊन मदतीची ग्वाही दिली.

## शेतकऱ्यांना संपुर्ण कर्ज माफीसह तात्काळ आर्थीक मदत करा- खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची मुख्यमंत्र्यांकड मागणी

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- माहे ऑगस्ट व सप्टेंबर २०२५ मध्ये धाराशिव लोकसभा मतदार संघातील सर्व तालुक्यात अतिवृष्टी झाली असून नद्या, नाल्यांना मोठया प्रमाणात पुर आला आहे. यामुळे जनजिवन वि स्कळीत झाले असून पुराचे पाणी अनेक गावांमध्ये शिरल्यामुळे नागरीकांच्या घराची पडझड झाली आहे. याच बरोबर काही ठिकाणी पशुधनाची मोठया प्रमाणात जिवीत हानी होवून शेतकऱ्यांच्या व शेत मजुरांच्या उपजिवीकेचे साधन पुराने हिरावून घेतले आहे. या पार्श्वभुमीवर धाराशिव लोकसभा मतदार संघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे शेतकऱ्यांना भरीव आर्थीक मदत करणेबाबत निवेदन दिले. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर धाराशिव कळंबचे आमदार कैलास पाटील उमरगा लोहाराचे आमदार प्रविण स्वामी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना निवेदन देवून मायबाप सरकारने शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढणेकरीता संपुर्ण कर्जमाफी देणेबाबत विनंती केली.

तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा, प्रधानमंत्री पिक विमा योजना या हंगामापासून उंबरठा उत्पन्नाच्या आधारे शेतकऱ्यांना पिक विमा देण्याची अट ठेवली आहे व यापुर्वी याच योजनेत १.पेरणी न होण्याची परीस्थिती (Prevented Sowing) २. प्रतीकुल हवामान (Mid season Adversity), ३. स्थानिक अपदा (Local Calamity) ४. पिक कापणी पश्चात आपदा (Post Harvest Calamity) या तरतुदी यावर्षीपासून बंद केल्यामुळे शेतकऱ्यांना पिक विमाच मिळणार नाही त्यामुळे सदरचे बदलेले निकष रद्द करुन या अटी या योजनेसाठी कायम ठेवाव्यात.मिरज व कोल्हापुर येथे अतिवृष्टी झाल्यानंतर जशा स्वरुपाची मदत महाराष्ट्र सरकार मार्फत करण्यात आली होती तशीच मदत यावेळी आमच्या भागात करावी.

अतिवृष्टी व पुरामुळे रस्ते, पुल, बंधारे, तलाव व विज वितरण कंपनीचे रोहीत्र व विजेचे खांब वाहून गेलेले आहे तरी याची दुरुस्ती करणेबाबत विशेष दुरुस्ती कार्यक्रम राबवून दुरुस्ती करावी. ज्या शेतकऱ्यांची जमीन खरवडून गेली आहे यामध्ये बहूभुधारक शेतकऱ्यांचा देखील समावेश करावा. ज्या शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे पशुधन पुरामध्ये वाहून गेले आहेत. अशा शेतकऱ्यांना त्या पशुधनाची भरपाई म्हणुन बाजार मुल्याप्रमाणे रक्कम द्यावी. अतिवृष्टीमुळे ज्या नागरीकांच्या घराची व शेतकऱ्यांची व मजुराची जनावरांचे गोठयांची पडझड झाली आहे त्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी.



पंजाब सरकारने अतिवृष्टीमुळे हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर केली आहे. अशीच मदत महाराष्ट्र सरकारने आमच्या भागातील शेतकऱ्यासाठी जाहीर करावी.

सर्व मागण्या तात्काळ मंजुर करुन शेतकऱ्यांना मदत करणेबाबत निवेदन देवून धाराशिव लोकसभा मतदार संघातील पुर स्थितीची दाहकता निदर्शनास आणून दिली.

## क्राईम न्युज

### सोन्याच्या दागिण्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-लोचना शिवाजी सुर्यवंशी, वय ५० वर्षे,रा. गोगाव ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.२१.०९.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटात ठेवलेले ४१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ६३,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-लोचना सुर्यवंशी यांनी दि.२३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (४), ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### चोरट्यांनी मोबाईल दुकान फोडले

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे : फिर्यादी शुभम मधुकर इंगळे, वय २७ वर्षे, रा. बार्शी नाका धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे नुतन शाळाच्या शेजारी गाळा क्र ५ धाराशिव येथील श्री मोबाईल दुकानाचे शटरची अज्ञात व्यक्तीने दि.२२.०९.२०२५ रोजी वरची बाजू पत्रा कापून टेक्नो पॉप-९ कंपनीचा मोबाईल, पोकॉ सी-७१ कंपनीचा मोबाईल, सॅमसंग एफ-०५ कंपनीचा मोबाईल सॅमसंग एम ६ कंपनीचा मोबाईल सॅमसंग क्टीव्ह टु कंपनीचे २ घड्याळ, जेन ०९ कंपनीचे ०२ घड्याळ एम.झेड कंपनीचे २ मिनी स्पीकर, आय टेल कंपनीचे किपॅडवाले ०५ मोबाईल असा एकुण ३५,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शुभम इंगळे यांनी दि.२३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३३१ (४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आह

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, सागर कुमार बारटक्के, वय ३६ वर्षे, ईलाही चांद तांबोळी, वय ५५ वर्षे, रा. मोमीण गल्ली कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी सु.छत्रपती संभाजी महाराज शॉपींग सेंटर जवळ साई पान स्टॉल कळंब येथे व छात्रपती शिवाजी महाराज चौक ते सोनार लाईन कडे जाणात्रया रोडच्या बाजूस आनंत स्टॉल येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ राजनिवास पान मसाला गुटखा, तंबाखु, सुगंधीत सुपारी पान मसाला असा एकुण १३,६६२ किंमतीचे विक्री करीत जवळ बाळगलेला असताना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- १२३, २२३, २७४, २७५, भा.न्या.सं. अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सव

### पं.जयतीर्थ मेवुंडींच्या गाण्याने रसिक तल्लीन ; समाजसेविका सुजाता चव्हाण यांचा सत्कार



तुळजापूर (माध्यम कक्ष)- श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाच्या प्रांगणात सुरू असलेल्या शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी किराणा घराण्याचे आघाडीचे शास्त्रीय गायक पं.जयतीर्थ मेवुंडी यांच्या सुमधुर गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या भावस्पर्शी सुरावटीनं सभागृहात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले.

'कानडा राजा पंढरीचा', 'माझे माहेर पंढरी' आणि 'सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा' यांसारख्या भक्तिगीतांच्या सादरीकरणावर श्रोते तल्लीन होऊन दाद देत होते.

कार्यक्रमाची सुरुवात पं.मेवुंडी, तहसीलदार व विश्वस्त अरविंद बोळंगे आणि तहसीलदार व व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.या वेळी सामाजिक कार्यकर्त्या सौ.सुजाता लक्ष्मण चव्हाण (बाबई) यांचा विशेष गौरव करण्यात आला.

बालविवाह निर्मूलनासाठी कार्यरत असलेल्या सुजाता चव्हाण यांनी आजवर तब्बल ७० बालविवाह रोखले आहेत.त्यांच्या या कार्याची दखल घेऊन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानतर्फे त्यांना देवीची प्रतिमा, कवड्याची माळ,महावस्त्र व अकरा हजार रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच पं.जयतीर्थ मेवुंडी व संगीत दिग्दर्शक गौरव चाटी यांचाही सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला पोलिस निरीक्षक शहाजी रूपनवर, महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, पाळीकर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे,मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती लाभली. शारदीय नवरात्र महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाचा हा कार्यक्रम संगीत, समाजसेवा आणि भक्तीचा संगम ठरला.

## श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव २०२५

### श्री तुळजाभवानी देवींजींची नित्योपचार पूजा




तुळजापूर (माध्यम कक्ष)- श्री क्षेत्र तुळजापूर येथील श्री शारदीय नवरात्र महोत्सवात आज बुधवार रोजी श्री तुळजाभवानी देवींजींची नित्योपचार पूजा संपन्न झाली.शारदीय नवरात्रीतील बुणवारची तिसरी माळ आहे.

पहाटे ६ ते सकाळी १० या वेळेत देवींची अभिषेक पूजा करण्यात आली.त्यानंतर आरती करण्यात झाली.काल मंगळवारी श्री तुळजाभवानी देवींची सिंह या वाहनातून छबिना मिरवणूक काढण्यात आली.छबिना मिरवणूकीला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शारदीय नवरात्र महोत्सवातील पूजा-अर्चा आणि छबिना मिरवणूकीने तुळजापूर नगरीत उत्साहाचे वातावरण आहे.पुढील आठ दिवस धार्मिक तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेता येणार आहे.

# शेतकरी बांधवांना वाऱ्यावर सोडणार नाही सर्व निकष बाजूला ठेवून सरसकट मदत
# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा : आ.राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-अतिवृष्टी आणि महापुरामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे. त्यामुळे मदतही अभूतपूर्वच असायला हवी अशी आग्रही मागणी आपण मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेबांकडे केली होती. त्यानुसार सगळे निकष बाजूला सारून सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत करण्यात येईल, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री देवंद्रजी फडणवीस यांनी बुधवारी उजनी (ता. औसा, जि. लातूर) येथे केली आहे. अभूतपूर्व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या घोषणेमुळे मोठा दिलासा मिळाला असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बुधवारी दुपारी औसा येथील हेलिपॅडवर आगमन झाले. तेथून त्यांनी मोटारीने उजनी गाठली. सोबत मित्रचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील होते. १२ सप्टेंबर रोजी रात्रभर झालेल्या अतिवृष्टीमुळे उजनीला पाण्याचा वेढा पडला होता. दुसऱ्याच दिवशी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी उजनीला भेट देऊन पाहणी केली होती. त्यांनंतर आमदार पाटील यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना मराठवाड्यावर ओढवलेल्या आपत्तीबाबत माहिती दिली होती.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी सोलापूर जिल्ह्यातील काही भागांना भेटी देऊन नुकसानीची पाहणी केली. त्यानंतर ते औसा परिसरातील नुकसानीची पाहणी करण्यासाठी आले होते. उजनीत पाहणी केल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. महाराष्ट्रासह मराठवाडा, लातूर, धाराशिव जिल्ह्यात ढगफुटीसारखा पाऊस झाला आहे. त्यामुळे नद्यांना पूर आला आणि ते पाणी शेतांमध्ये शिरल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जमीन खरडून गेली. घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे धान्यासह संसारोपयोगी साहित्याचेही मोठे नुकसान झाले. त्यामुळेच आपण स्वतः पाहणी करण्यासाठी येथे आलो असल्याचे मुख्यमंत्री महोदयांनी नमूद केल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, की ही परिस्थिती पाहूनच शासन म्हणून मी आपल्याला आश्वस्त करतो, की सर्व निकष बाजूला सारून सर्व शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी केलेल्या या जाहीर घोषणेचे उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. टंचाईच्या परिस्थिती ज्या उपाययोजना केल्या जातात, तशाच उपाययोजना आता करण्यात येतील. ज्यांच्या घरांचे, दुकानांचे नुकसान झाले आहे, त्यांनाही मदत केली जाणार असल्याचे सांगत त्यासाठी मदतीचा २३०० कोटींचा पहिला हप्ता कालच जारी करण्यात आला असल्याचे मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे. आता या नुकसानीची पाहणी झाल्यानंतर तातडीने ही मदत केली जाईल. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडणार नाही, असे त्यांनी पुन्हा एकदा आवर्जून नमूद केल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले.

यावेळी लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह मंत्री गिरीश महाजन, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार अभिमन्यू पवार, आमदार संजय बनसोडे, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## महिला खेळाडूंसाठी सुवर्णसंधी :ASMITA Sports for Women 2025-26 स्पर्धांची घोषणा

धाराशिव,दि.२४ सप्टेंबर (जिमाका) केंद्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणारी ASMITA Sports for Women ही महत्त्वाकांक्षी योजना २०२१-२२ पासून सुरू असून आजपर्यंत देशभरात १,३९० हून अधिक महिला लीग यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत.या उपक्रमांतर्गत २८ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये ५०० पेक्षा जास्त शहरांमध्ये झालेल्या स्पर्धांमध्ये तब्बल १ लाखाहून अधिक महिला खेळाडूंनी २९ क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग नोंदविला आहे.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात १५ हून अधिक क्रीडा प्रकारांमध्ये १००० पेक्षा जास्त अस्मिता लीग घेण्यात येणार असून, ७० हजारांहून अधिक महिला खेळाडूंना संधी मिळणार आहे.या खेळांमध्ये सायकलिंग, वेटलिफ्टिंग, किकबॉक्सिंग, वुशू, योगासन,तायक्कांदो,फुटबॉल, ज्युदो, बॅडमिंटन, रग्बी तसेच कनोईंग व कयाकिंग यांचा समावेश आहे.

या स्पर्धा सर्व महिला खेळाडूंसाठी खुल्या असतील.तथापि,स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ये-जा करण्याचा प्रवास खर्च,हातखर्च भत्ता तसेच क्रीडा मार्गदर्शक,व्यवस्थापक व फिजिओ यांचे मानधन ही जबाबदारी केंद्र किंवा राज्य शासन उचलणार नाही,याची नोंद खेळाडूंनी घ्यावी.

जिल्ह्यातील महिला खेळाडूंनी या राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठाचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी इच्छुकांनी श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

## जिल्ह्यात टपाल बुकिंग वेळेत वाढ : नागरिकांना अधिक सुविध

धाराशिव (जिमाका)- सामान्य नागरिकांना स्पीड पोस्ट, रजिस्टर, पार्सल तसेच आंतरराष्ट्रीय पार्सल सेवा अधिक सुलभ व्हावी म्हणून धाराशिव जिल्ह्यातील प्रमुख टपाल कार्यालयांमधील टपाल बुकिंग वेळेत वाढ करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे देशांतर्गत व परदेशातील टपाल व्यवहार नागरिकांना अधिक सोयीस्कर होणार आहेत.सुधारित वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे.

धाराशिव प्रधान कार्यालय, आनंदनगर टपाल कार्यालय - सकाळी १०.०० ते रात्री ८.०० (सर्व कामकाजाच्या दिवशी).धाराशिव टाउन,मिल्ली कॉलनी,तुळजापूर, भवानीमंदिर, उमरगा व उमरगा बाजार टपाल कार्यालये - सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० (शनिवारी). पूर्वी ठरविण्यात आलेली वेळ २.०० वा.पर्यंतच होती; मात्र आता ती वाढवून दुपारी ३.०० वाजतापर्यंत करण्यात आली आहे.यामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना टपाल बुकिंगसाठी अधिक वेळ उपलब्ध होणार आहे. हा निर्णय त्वरित प्रभावाने लागू होत असल्याचे अधीक्षक डाकघर, धाराशिव विभाग (मुख्यालय लातूर) यांनी कळविले आहे.

## राष्ट्रीय विधी सेवा दिनानिमित्त छायाचित्रण व कला प्रदर्शन
### २५ सप्टेंबरपर्यंत छायाचित्रे,रेखाचित्रे किंवा व्हिडीओ सादर करावे

धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या स्थापनेला ३० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राष्ट्रीय विधी सेवा दिन २०२५ दरम्यान ८ व ९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय छायाचित्रण आणि कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमात छायाचित्रे,रेखाचित्रे तसेच १ मिनिट कालावधीपर्यंतचे व्हिडिओ यांद्वारे न्यायाची उपलब्धता व विधी सेवेची भूमिका अधोरेखित करण्याचा उद्देश आहे.

जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा व आपली कलाकृती २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत सादर कराव्यात,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.स्वप्नील चंद्रकांत खटी व सचिव श्रीमती भाग्यश्री कांबळे पाटील, दिवाणी न्यायाधीश यांनी केले आहे.

उपक्रमासंदर्भातील अधिक माहितीसाठी नागरिकांनी सकाळी १०.३० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उस्मानाबाद येथे संपर्क साधावा किंवा भ्रमणध्वनी क्रमांक ८५९१९०३६२५ वर संपर्क साधावा,असे कळविण्यात आले आहे.

## गावठी अवैध दारु विक्रीच्या उद्देशाने बाळगल्या प्रकरणी गुन्हा दाखल

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत सुमन वर्षे रामनगर झोपडपट्टी बेंबळी ता. जि. धाराशिव या दि.२३.०९.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरा समोरील पत्राचे शेडमध्ये अंदाजे २,५०० किंमतीची २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर बालाजी रा. शुक्रवार पेठ तुळजापूर ह.मु. काजळा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२३.०९.२०२५ रोजी रुईभर ते बेंबळी रोडवर हॉटेल राजगड समोर लक्ष्मी धाबा समोर अंदाजे ८२० किंमतीच्या १० देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर परसुराम रा. बरमगाव खु. ता. जि. धाराशिव हे दि.२३.०९.२०२५ रोजी २०.०० वा. सु बरमगाव ते केशेगाव जाणारे रोडच्या डाव्या बाजूला पत्र्याचे शिवशाही हॉटेलमध्ये अंदाजे ९८० किंमतीच्या १४ देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द म बेंबळी पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

## खासदार ओमराजेंनी हंगरगा (नळ) ग्रामस्थांशी साधला व्हिडीओ कॉलद्वारे संवाद



जळकोट (विजय पिसे)- नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे तुळजापूर तालुक्यातील हंगरगा (नळ) या गावाजवळून व साठवण तलावाकडून वाहत येणाऱ्या नाल्याचे पाणी नागरीकांच्या घरांमध्ये घुसले . कांही घरांच्या भिंतीही पडल्या . जनावरांसाठी साठा करून ठेवलेला चाराही वाहुन गेला . हंगरगा - जळकोट रस्त्यावरील पूलावर मोठ्या प्रमाणावर पाणी आल्यामुळे दोन्ही गावांकडे जाणारी येणारी वहातुक बंद झाली होती . परिणामतः हंगरगा (नळ) गावचे खूप मोठे नुकसान झालेले आहे . हि बाब समजताच, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे तथा जळकोटचे उपसरपंच प्रशांत नवगिरे , हे शिवसेनेच्या कृष्णात मोरे , अनिल छत्रे व रोहन पाटील या पदाधिकाऱ्यांसह हंगरगा (नळ ) गावास भेट दिली . अतिवृष्टीमुळे झालेल्या सर्व नुकसानीची पाहणी करून प्रशांत नवगिरे यांनी ही सविस्तर माहिती तात्काळ धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना व्हिडीओ कॉल करून सर्व ग्रामस्थांसमक्ष सांगितली . खासदार ओमराजेंनी सर्व नुकसानीची माहिती सविस्तर ऐकून घेऊन , तातडीने याबाबत पंचनामे करून पुढील कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देतो . काळजी करू नका मी आपल्या सर्वांच्या सोबत आहे . असे सांगून, ज्या अरुंद व छोट्या नाल्यामुळे अतिरिक्त झालेले पाणी नागरीकांच्या घरांत घुसले . त्या नाल्याची रुंदी व खोली वाढवून नाला मोठा करण्यासाठी संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना बोलतो असेही सांगितले .

याप्रसंगी उपस्थित हंगरगा (नळ) गावचे विद्यमान सरपंच अतुल कलशेट्टी , उपसरपंच दयानंद चौगुले व अतिवृष्टी बाधित शेतकरी , ग्रामस्थ यांचेशीही खासदार ओमराजेंनी व्हिडीओ कॉलद्वारे संवाद साधला . यामुळे हंगरगा (नळ ) येशील अतिवृष्टी बाधित शेतकरी, नागरीक व ग्रामस्थ यांनी समाधान व्यक्त करून खासदार ओमराजेंचे आभार मानले .

## जिल्ह्यात नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी संपन्न

धाराशिव, (जिमाका) केंद्रपुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम (ULLASANBSK) अंतर्गत रविवारी २१ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्यात असाक्षर नागरिकांसाठी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी (FLNAT) घेण्यात आली.सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ही परीक्षा जिल्ह्यातील नोंदणी झालेल्या शाळांमध्ये पार पडली.

जिल्ह्यातील एकूण १०३२ परीक्षा केंद्रांवर ८५७७ परीक्षार्थी उपस्थित होते.तालुकानिहाय उपस्थिती पुढीलप्रमाणे -

धाराशिव : १७२ केंद्रे - ९६८ परीक्षार्थी. कळंब : १२३ केंद्रे - १२३६ परीक्षार्थी. तुळजापूर : १७६ केंद्रे - १४०९ परीक्षार्थी. वाशी : ७२ केंद्रे - ५९० परीक्षार्थी.भूम : १४८ केंद्रे - १४८२ परीक्षार्थी.

परांडा : १०५ केंद्रे - ७९३ परीक्षार्थी. लोहारा : १४१ केंद्रे - १३५२. परीक्षार्थी. उमरगा : ७६ केंद्रे - ७४७ परीक्षार्थी. १०३२ परीक्षा केंद्रावर ८५७७ परीक्षार्थींनी परीक्षा दिली.

या परीक्षेचे आयोजन सुयोग्य रितीने पार पडल्याची माहिती शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद धाराशिव श्री.नागेश मापारी यांनी दिली.

## करजखेडा येथील शेतातून दोन म्हसीची चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-राजेंद्र गिरजप्पा भंडारकर, वय ६८ वर्षे,रा. करजखेडा ता. जि. धाराशिव यांचे शेत गट नं ३७ नॅशनल हायवे क्रं ३६१ च्या शेजारील घरासमोर बांधलेल्या दोन म्हशी एकुण ८५,००० किंमतीच्या अज्ञात व्यक्तीने दि.१४.०९.२०२५ रोजी ०७.०० ते दि. १५.०९.२०२५ रोजी ०२.०० वा. सु. चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राजेंद्र भंडारकर यांनी दि.२३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


## लातूर समाचार धाराशिव
### बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649